# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०७/०८/२०२५ (गुरूवार)

---

**अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ६ आरोपीतांविरूध्द नविन कायदा भारतीय न्याय संहीता २०२३ मधील किरकोळ संघटीत गुन्हेगारी च्या कलम ११२ अन्वये गुन्हा नोंद, आरोपींना अटक, मा. न्यायालयाने दिली पोलीस कोठडी**

दिनांक ०६/०८/२०२५ रोजी पोलीस ठाणे रामटेक येथील दाखल १) अप क्र. ५७७/२५ कलम १२ मजुका सह कलम ४९ भारतीय न्याय संहीता मधील आरोपी क्र. १ लिकेश दयालराव रामटेक वय ३८ वर्षे रा. नेहरू वार्ड रामटेक आरोपी क्र. २ जयकिसन गणपत कुछवाहा वय ३५ वर्षे रा. महात्मा फुले वार्ड रामटेक २) अप क्र. ५७९/२५ कलम १२ मजुका सह कलम ४९ भारतीय न्याय संहीता मधील आरोपी क्र. १ बबलु तुलाराम सोन कुसरे वय ३५ वर्ष रा. महात्मा फुले वार्ड रामटेक आरोपी क्र. २ ज्ञानेश्वर श्यामरव क्षिरसागर वय ४२ वर्षे रा. महात्मा फुले वार्ड रामटेक यास अटक करण्यात आली. ३) अप क्र. ५८०/२५ कलम १२ मजुका सह कलम ४९ भारतीय न्याय संहीता मधील आरोपी क्र. १ महेश भैय्याजी बरगट रा. सुभाष वार्ड आंबेडकर चौक रामटेक आरोपी क्र. २ निलेश बाळकृष्ण नान्हे वय ३० वर्ष रा. शनिवारी वार्ड रामटेक  नमुद आरोपी हे संघटीतपणे गुन्हा करीत असल्याचे पोलीसांचे तपासात निष्पन्न झाल्याने सदर गुन्हयात मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात पोलीसांनी भारतीय न्याय संहीता कलम ११२ (किरकोळ संघटीत गुन्हेगारी) हे कलम वाढ करणे बाबत प्रस्ताव श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक यांचे कडे पाठवुन मंजुरी मिळवुन सदर गुन्हयात भारतीय न्याय संहिता कलम ११२ अन्वये वाढ करून वरील सर्व ६ आरोपी पैकी २ आरोपी फरार असल्याने ४ आरोपीतांना जुगाराच्या गुन्हयात अटक करून यातील मा. प्रथमवर्ग न्यायालयात हजर केले असता मा. न्यायालयाने त्यांचा पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे.

नागपुर ग्रामीण जिल्हया मध्ये अवैध जुगाराच्या गुन्हयातील आरोपीवर सुध्दा नविन कायदा भारतीय न्याय संहीता कलम ११२ (किरकोळ संघटीत गुन्हेगारी) अन्वये कडक कारवाई केली जात आहे

## नरखेड पोलीसांनी केली खुनाच्या गुन्हयातील फारार झालेल्या आरोपीला अटक

पोलीस स्टेशन नरखेड नागपुर यग्राण्द्ध येथे मृतकनामे नंदलाल चंद्रभान कोडापे वय ३६ वर्ष रा. अंबाडा देशमुख ताण् नरखेड याला आरोपी नामे शेखर चंद्रभान कोडापे वय ३४ वर्ष रा. अंबाडा देशमुख ताण् नरखेड याने तू घर खर्चाला घरात पैशे का देत नाही या कारणावरून लाकडी काडीने मारून जिवानीशी ठार केले. अशा फीर्यादि नामे श्रीमती सुमन चंद्रभान कोडापे वय ६२ वर्ष रा. अंबाडा देशमूख ताण् नरखेड यांचे तोंडी रीपोर्ट वरून आरोपी नामे शेखर चंद्रभान कोडापे वय ३४ वर्ष रा. अंबाडा देशमुख ताण् नरखेड याचे विरूदध पोलीस ठाणे ला अप क्र ४४८/२०२५ कलम १०३ (१) बी.एन.एस अन्वये गून्हा नोंद असून तपासात होता व नमूद गून्हयातील आरोपी घटनेपासून अंधाराचा फायदा घेवून जंगलात फरार झाला होता त्याचा शोध घेवनूही तो मिळून येत नव्हता म्हणून सदर गून्हयातील आरोपीचे शोधात मा. वरिष्ठाच्या मार्गदर्शनाखाली तीन वेगवेगळे पथके तयार करून अप क्र ४४८/२०२५ कलम १०३ (१) बी. एन.एस भा.न्या.सं. या गुन्हयातिल आरोपिचा गोपनीय माहीतीच्या आधारे कसोशीने शोध घेवुन आरोपी नामे शेखर चंद्रभान कोडापे वय ३४ वर्ष रा.अंबाडा देशमुख ताण् नरखेड याला ताब्यात घेवुन त्याच्याकडे कौशल्यपुर्ण गुन्हयासंबधाने विचारपुस केली असता त्याने नमूद गून्हा केल्याचे कबुली दिल्याने त्याला नमूद गुन्हयात अटक करून कोर्टात हजर केले असता माण् कोर्टाने नमूद आरोपीला दिनांक ०८/०८/२०२५ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली अशा प्रकारे खूनाच्या गुन्हयातील फरार झालेल्या आरोपीस अटक करण्यात पोलीस स्टेशन नरखेड येथील पोलीस पथकास यश आलेले आहे.

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद,२० लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त, १ आरोपी अटक भिवापूर पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन भिवापूर :— दिनांक ०६/०८/२०२५ रोजी भिवापुर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी कारगाव रेल्वे क्रासींग भिवापुर १२ किमी पश्चिम येथे नाकाबंदी करून वाहनांची तपासणी केली असता टिप्पर क्रमांक एम.एच. ४० बी. जी ४००६ हे वाहन मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. ट्रक चालक हा फरार असून ट्रक मध्ये अंदाजे ६ ब्रास रेती मिळून आली. वाहन मालकाची माहीती काढली असला, ट्रक मालक मोहम्मद वाहीद मोहम्मद अजीज खान खरबी नरसाळा नागपूर असे ट्रक चालक व मालक यांना आरोपी करण्यात आले. पोलीसांनी पंचासमक्ष १) टिप्पर क्रमांक एम.एच. ४० बी. जी ४००६ किमती २०,००,००० /— रूपये व २) ६ ब्रास रेती किंमती ३०,०००/— रूपये आणि असा एकुण २०,३०,०००/— रूपयेचा माल जप्त करण्यात आला.

नमुद वाहन चालक/मालक आरोपी नामे मोहम्मद वाहीद मोहम्मद अजीज खान खरबी नरसाळा नागपूर याचे विरूध्द पोस्टे भिवापूर येथे अप क्र. ५२३/२५ कलम ३०३(२),४९.,३(५)

भा.न्या.स सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल संहीता १९६६, सहकलम ४,२१ खान आणि खनिज अधिनियम सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४, सह कलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अंमलीपदर्थाची विक्री करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद,आरोपी अटक
## स्थानिक गुन्हे शाखा,नागपुर ग्रामीण यांची कारवाई

दिनांक ०६/०८/२०२५ स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण चे पथक पोलीस स्टेशन कुही हद्दीत अवैध धंदयावर कारवाई कामी पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, वार्ड क्र. १ येथे राहणारी महीला ही अंमली पदार्थ गांजा बाळगुन गांजाची विक्री करत आहे. मिळालेल्या महीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी जावुन सापळा रचुन महीला आरोपी वय ५५ वर्षे, रा. वार्ड क्र १, कुही जि. नागपुर हिला ताब्यात घेवुन तिची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता नमुद आरोपीचे ताब्यात अंमली पदार्थ गांजा मिळुन आला. पोलीसांनी नमुद आरोपीच्या ताब्यातुन १) ७२८ ग्राम वाजनाचा अंमली पदार्थ गांजा किंमती १४,५६५/—रुपये, १ मोबाईल किमंत १०००/— रूपये असा एकुण १५,५६५ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

महीला आरोपी यांच्या विरूध्द एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास कुही पोलीस करत आहे.

## नागपूर जिल्हयातील ३ पेट्रोलियम प्लान्टने पोलीस व औद्योगिक विभागाचे समन्वयातून राबविली लेवल ३ ऑफ साईट मॉकड्रिल

आज दिनांक ०७/०८/२०२५ चे ११:०० वा. दुधा एमआयडीसी बोरी परिसरात लेवल ३ ऑफ साईट मॉकड्रिल आयोजित केलेली होती सदर मॉकड्रिल इंडियन ऑईल LPG बॉटलिग प्लान्ट दुधा एमआयडीसी बोरी, भारत पेट्रोलियम डेपो बोरखेडी एमआयडीस बोरी व इंडियन ऑईल LPG बॉटलिग प्लान्ट खापरी या प्लान्टच्या पदाधिका—यांनी पोलीस विभाग, औद्योगिक सुरक्षा विभाग व अग्नीशमन विभागाचे समन्वयातून संयुक्तीकरित्या राबविलेली आहे. सदर मॉकड्रिल मध्ये पोलीस विभागाचे श्री. दिपक अग्रवाल (भापोसे) उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग नागपूर, श्री. प्रतापराव भोसले ठाणेदार बोरी श्री. प्रमोद भोंगे जिल्हा विशेष शाखा श्री. राजेन्द्र पाटील सुरक्षा शाखा हे दहशतवाद विरोधी शाखा, सुरक्षा शाखा, नक्षल शाखा, पोलीस ठाणे बेला व एमआयडीसी बोरी, येथील पोलीस स्टाफसह उपस्थित होते तसेच वर नमुद पेट्रोलियम प्लान्टचे पदाधिकारी श्री. वॉम्शी क्रीष्णा सिनियर मॅनेजर, श्री. सौरभ तिवारी सुरक्षा अधिकारी इंडियन ऑईल LPG बॉटलिग प्लान्ट दुधा एमआयडीसी बोरी, श्री. अंकित तिवारी सिनियर प्लान्ट मॅनेजर श्री. रोहीत सोनकुसरे सुरक्षा अधिकारी इंडियन ऑईल LPG प्लान्ट खापरी श्री. कन्हैयालाल सुरक्षा अधिकारी भारत पेट्रोलियम LPG बॉटलिग प्लान्ट टाकडघाट, एआयडीसी बोरी श्री. मनिष भगत सुरक्षा अधिकारी भारत पेट्रोलियम डेपो बोरखेडी एमायडीसी बोरी हे प्लान्टचे सुरक्षा रक्षक व सामुग्रीसह हजर होते.




## सर्पदंशामुळे वृध्द महिलेचा मृत्यु

अंबाडी येथिल घटना मंत्रतंत्रामुळे गमावला जीव :— नमुद दिनांक ०७/०८/२०२५ रोजीच्या बातमीच्या अनुषंगाने श्री. सतोष गायकवाड उपविभागीय पोलीस अधिकरी कामठी विभाग कार्यालय कन्हान, सारीन दुर्गे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे मौदा तसेच बिट अमंलदार व गोपनिय अमंलदार यांनी अंबाडी गावाला भेट देवून गावातील प्रतिष्ठीत नागरिक यांचे सोबत संवाद साधून व गोपनिय माहिती घेवुन सर्पदंशाबाबत माहिती घेतली असता दिनांक ०५/०८/२०२५ रोजी श्रीमती चंद्रभागा महादेव भुसारी वय ८२ वर्ष हि गावातील श्रीकांत बबन ठाकरे यांचे शेतात मजुरीचे कामाला गेली शेतात कचरा काढत असतांना अचानक तिला सापाने उजवे हाताचे अंगठया जवळील बोटाला चावा घेतला परंतु तिला उंदराने चावले असावे असे वाटल्याने तिने लक्ष न देता काम करत राहीली. काही वेळाने तिची प्रकृती खालावल्याने तिला प्रथम उपचारा करिता प्राथमिक आरोग्य केंद्र भुगांव येथे नेले तिथे प्राथमिक उपचार करून पुढील उपचारा करिता रेफर केल्याने तिला उपचाराकरिता मेडीकल कॉलेज नागपूर येथे नेले असता वैद्यकिय अधिकारी मेडीकल कॉलेज नागपूर यांनी तपासून मृत घोषित केले.

नमुद बातमीतील मंत्र तंत्र करणारे बाबत गावात विचारणा केली असता असे कोणीही मंत्रतंत्र करणारे गावात नाही असे उपसंरपच, पोलीस पाटील व गावकरी यांनी सांगितले असून सदर महीलेवर कोणतेही गावठी उपचार केले नसल्याचे सांगितले.

# रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ०६/०८/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ०७/०८/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री. दिपक अग्रवाल, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपूर विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत बोरी टाउन येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन श्री. दिपक अग्रवाल यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. गार्डन चौक येथे नाकाबंदी करण्यात आली. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये बोरी पोलीस स्टेशन सह दंगा नियत्रंण पथकाचे अंमलदार हजर होते.




मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने